सत्यमेव जयते

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,**
**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**
**दूरध्वनी : ०२०-२६१२२९००/२६१२२७३९** Email - commcoop२०११@gmail.com

**जा.क्र.सर्वसा/15सआ/ सांगली व कोल्हापूर अपातग्रस्तांना /2019**/९४६ दि :- १५ ऑगस्ट,2019

आवाहन पत्र

<u>सांगली व कोल्हापूर अपातग्रस्तांना मदत करण्याबाबत</u>

आपणास विदितच आहे की, सद्यस्थितीत सांगली व कोल्हापूर जिल्हयामध्ये महापूरामुळे तेथील सामान्य जनजीवन बाधित झालेले आहे. तसेच मालमत्तेची व जिविताची देखील मोठया प्रमाणात हानी झालेली आहे. सदर नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या आपतग्रस्तांना सामाजिक बांधिलकी व मानवतेच्या दृष्टिकोणातून आर्थिक मदत करणे आवश्यक आहे. त्यासाठी सहकारी संस्थांच्या माध्यमातून आपतग्रस्तांच्या मदतीकरीता निधी जमा करण्यासाठी " मुख्यमंत्री सहाय्यता निधि " या नावाने " धनादेश / धनाकर्ष " जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयामध्ये द्यावयाचा आहे. तसेच सक्षम व मोठया बँकांना किंवा पतसंस्थाना ज्या गावांची अपरिमित हानी झालेली आहे अशी गावे दत्तक घ्यावी, व यासाठी आपण स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याशी समन्वय साधून गावे निवडावीत, असे आपणास आवाहन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 69 व शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 1017/प्र.क्र.93/13-स, दिनांक 23-8-2017 नुसार सहकारी संस्थांना नैसर्गिक आपत्ती तसेच सार्वजनिक प्रयोजनासाठी अर्थसहाय्य देता येते. तरी मी सदर पत्राद्वारे आपणास आवाहन करतो की, सांगली व कोल्हापूर जिल्हयामधील आपतग्रस्तांच्या मदतीकरिता सार्वजनिक प्रयोजनासाठी यथायोग्य अंशदान "मुख्यमंत्री सहाय्यता निधि" साठी जमा करावे किंवा आपातग्रस्त भागातील गावे दत्तक घ्यावीत व आपण याबाबत करीत असलेल्या कार्यवाहीबाबत संबधित जिल्हा उपनिबंधकांना व या कार्यालयास अवगत करावे.

(सतीश सोनी)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

1. प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या, मुंबई
2. चेअरमन / व्यवस्थापकीय संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (सर्व)
3. चेअरमन / मुख्य कार्यकारी अधिकारी, नागरी सहकारी बँका
4. चेअरमन / मुख्य कार्यकारी अधिकारी, नागरी सहकारी बँक फेडरेशन (सर्व)
5. चेअरमन / व्यवस्थापक, नागरी सहकारी पतसंस्था
6. चेअरमन / मुख्य कार्यकारी अधिकारी, नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन
7. चेअरमन / मुख्य कार्यकारी अधिकारी, हौसिंग फेडरेशन

(चेअरमन/व्यवस्थापकीय संचालक सर्व फेडरेशन यांना कळविण्यात येते की, आपतग्रस्तांच्या मदतीसाठी आपणामार्फत संलग्न संस्थांना आवाहन करुन निधी जमा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी)

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :

1. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
2. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
   यांना कळविण्यात येते की, सदर निधीकरीता नोंदवही ठेवून धनादेश / धनाकर्ष ची पोहच संबंधित संस्थेला देण्यात यावी व संस्थानिहाय प्राप्त धनादेश/धनाकर्ष क्रमांक व रकमेची यादी तसेच प्राप्त धनादेश / धनाकर्ष या कार्यालयास सादर करण्यात यावे.
3. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-1, सहकारी संस्था (सर्व)
4. कार्यासन अधिकारी, (सर्व) मुख्यालय, पुणे

:- आपणास कळविण्यात येते की, आपल्या संबधित उपरोक्त 1-7 मधील संबधित संस्थाना आपले स्तरावरुन अवगत करणेत यावे.